म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७७२

१९५८

# जोगवा

आरती प्रभु

REFBK-0010582
REFBK-0010582

मौज प्रकाशन

मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

किंमत साडेतीन रुपये

# जोगवा

अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ....................

# जोगवा

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलपत.
अनुक्रम 22002 वि: काव्य
क्रमांक 1442 नों: दि: १८/११/८८

आरती प्रभु

REFBK-0010582
REFBK-0010582
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 90412

मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

किंमत साडेतीन रुपये

मौज प्रकाशन : ३७

पहिली आवृत्ती : २० सप्टेंबर, १९५९

© चिं. त्र्यं. खानोलकर : १९५९

वेष्टनावरील चित्र :
दीनानाथ दलाल

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

ती. कै. भाऊ

ती. आई

आणि

ती. दादामामा यांना

अनुक्रम २५८०२ वि: ८१०५
क्रमांक ९४०२ नों: दि: १५१११५

# अनुक्रम


| | |
|---|---|
| जोगवा | १ |
| शून्य शृंगारतें | ३ |
| मिळालेलें मला खूळ | ४ |
| नादवेणा मौनांतली | ५ |
| विचित्रसें दुःख | ६ |
| झरे निळी सर | ७ |
| गंध | ८ |
| तिचा नवसाचा गर्भ | ९ |
| ओझें | १२ |
| तुझें मन | १४ |
| इथेंच | १६ |
| काळोखाची गांठ जिवाला | १८ |
| नशेंत कस्तुरी | १९ |
| आणि ओठांत जांभई | २० |
| आड येते रीत | २१ |
| कांपऱ्या हातांनीं | २३ |
| जाईजुईची जांभई | २४ |
| गतस्मृतींचा कापुरपेला | २५ |
| तुझ्याभोवतीं | २६ |
| मातीची अंबारी | २७ |
| आणि विजेचा देठ तुटेना | २९ |
| अशक्याला लांबी | ३० |
| रिती कां हो? | ३२ |
| मिठी | ३३ |
| कपाळाला अर्धी आठी | ३४ |
| सांगावया वाटे लाज | ३५ |
| जन्म गेले तरी न्हातें | ३६ |
| सुख | ३७ |
| सीमेवर | ३८ |
| तुझ्या मार्गीची पथारी | ३९ |
| थवकलों | ४० |
| पाप इमानी | ४१ |
| झाडें नग्न झालीं | ४२ |
| अंतापास | ४३ |
| पाला | ४४ |
| रात्र रक्तभरतीची | ४५ |
| इथें सरे...तिथें उरे | ४७ |
| तुझा किनारा | ४८ |
| माळ ओसरे | ४९ |
| वेदना | ५० |
| हांसायाचें आहे मला | ५१ |
| डाग पडे चंद्रा | ५२ |
| देण्यासाठीं—घेण्यासाठीं | ५३ |
| कधीं विझूं गेली नार? | ५६ |
| लेखणीला शाई | ५७ |
| उन्हें वावतां निळींचीं | ५८ |
| कथा | ५९ |
| फेडुन घळली | ६० |
| प्रारंभापासोन | ६१ |
| लिहून थोडें | ६२ |
| काय नराच्या बेंबीमधुनी | ६३ |
| पेंग येते चांदणीची | ६४ |
| पापणीच उष्टी | ६६ |
| ढग लागून जिव्हारीं | ६७ |
| गिरकी जाते कळसापरती | ६८ |
| तुझ्यावीण तुझ्यापास | ६९ |
| लक्ष लक्ष | ७० |
| घोट गढूळले पुरे | ७१ |
| मरतां मरतां नंगें जावें | ७२ |
| डहाळी | ७३ |

श्वान माझ्या किरणांचें ७४
आतां रुजवण व्हावी ७५
हरवला चैतन्याचा पूत ७६
हिर्व्या चुका ७७
व्यंग नवें स्वामी जपा ७८
मनाचा मुकुंद ७९
छातीवर हादरा ८०
अर्धी संध्याकाळ आतां ८१
कहाणी ८२
व्रतस्थ माझी फक्त पापणी ८३
आंबा पिके तसूतसू ८४
अशा वेळीं ८५
वास आहे ना फुलांना? ८६
देणें ८७
हृदयाच्या ठेक्यापुढें ८८
फिरतो व्यंगांचा स्वामी ८९
ती ९०
चुके न ठेका ९१
अर्घ्य ९२
कळतें तें रक्ताला ९४
तुझी माळ गुंफ त्वरें ९५
ज्याचीं फुलें फुलें झालीं ९६
मी मधें पाहुणा ९७
अंतराळ उल्का उल्का ९८
झिम्मा १००
गर्भार १०२
पुढील प्रदेशा १०३
दीपदान १०४
झाडें वांकलीं १०५
पाहिलेंच नाहीं कोणी १०७
भार १०८
मनाचा दगड १०९
देहपूजा ११०
डोह ११२

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४७ | ७ | डोळ्यांत पुढें | डोळ्यांपुढें |
| ९३ | १२ | परंतु | परतुं |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २५६०२ विः ३।८५
क्रमांक ९०५१२ नोंः दिः ७५।७।८

# जोगवा

हवें झाड ध्याया लपेटून वक्षीं,
मिळेना कवेला चहों बाजुंनीं ;
उठाया धजेना दऱ्यांतून आभा ;
उरीं रक्तगाभा निळा गोठुनी.

दिसावा दिशांच्या मधें देवतारा
असा हट्ट घेतां लवे पापणी ;
निघे मावळाया अहोरात्र दृष्टी,
मुका मार लागे मना आडुनी.

पिसांचीच हातीं उरे गुंफणी अन्
वळाया कुठें ना जरा आसरा ;
कुणी देत मांडी खुडूनीहि वस्त्रें :
टिपाया नुरे वस्त्र अन् आंसवां.

शिवेना मनाला कधीं चारुगात्री,
दिलीं मद्यपात्रें तिनें मांडुनी ;
फुटेनाच पात्रां स्वरांचा तरंगऽ,
तशी पाठमोरी बसे भांडुनी.

विरे चैत्रवारा उसासून अभ्रीं,
शिडें शुभ्र शिल्पस्थ दर्यामधें ;
नसे आग्रहाची इथें घट्ट कक्षा,
तरी दीपते छिन्नि गर्वामधें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९०५१२
शाखा (स्थळ प्रत)

फुलां वास येतो इथें ओवतींचा;
फिरेनाच मर्मीं कधीं भोवरा;
जिभेच्या पुढें ओठ बंदिस्त झाले;
कडू घोट जीवा करी बावरा.

दिगंतास गर्भांतल्या या झुगारूं
नसे आज सामर्थ्य पंखांत या;
कण्हे रोमरंध्रीं मनाचीच पीडा;
रुताया नसे ओल पंकांत या.

भरे रक्तलाली कुठें दूर रानीं...
इथें दीन मागे असा जोगवा;
जपे (चालणारा किनाऱ्यास पंगू)
मणीबंध-नाडीवरी पारवा.

फुकाचाच लिंपीत मी वाळुमध्यें
(म्हणाया धुक्याची ऋचा) कोयळा;
नसे या दिसां लाल प्रारंभ कोठें,
मिळेना भुई लाल या पाउलां...

एप्रिल, १९५८

# शून्य शृंगारतें

आतां सरी वळवाच्या ओसरूं लागल्या,
भरे निळी नवलाई जळीं निवळल्या.

गंधगर्भ भुईपोटीं ठेवोन वाळलीं
भुईचंपकाचीं पानें कर्दळीच्या तळीं.

कुठें हिरव्यांत फुले पिवळा रुसवा,
गगनास मेघांचा हा पांढरा विसांवा.

आतां रात काजव्यांची माळावर झुरे,
भोळी निर्झरी मधेंच बरळत झरे.

धुकें फेसाळ पांढरें दवंळून दंवे
शून्य शृंगारतें आतां होत हळदिवें.

७.१०.५३

# मिळालेलें मला खूळ

फळा हळदिव्या झाकी हिरवासा पंख,
रस गळे...करी चोंच लालसर डंख!

अशी पांखरून छाया, लावोनियां माया,
आनंदाचे आसूं लावी कोण ओघळाया ?

कधीं एकाएकीं दाटे दिठीमध्यें खोल,
अश्रूपरी गोल गोल, गूढ त्याचा बोल:

परी नाहीं कळलेला, छंदीं जुळलेला,
अर्थ त्याचा अजूनही दूर उरलेला.

दिसे पिशापरी केव्हां बरळतें आंत,
केव्हां लावण्याचें गूढ बसे उकलत,

आहे त्याचें मिळालेलें खूळ मला फक्त
शून्याहून निळें तरी हासतां आरक्त!

७·१०·५३

# नादवेणा मौनांतली

शहारते संथ जळीं निळीकाळी खंत,
नादवेणा मौनांतली हुंकारे वेळूंत ;

घुसमटे खोल कळ किटेल्या शून्यांत,
फुटायाचा आहे कोंभ आसूंच्या थेंबांत.

झुरल्यात ऐशा राती व्यथा तेवल्यात,
ठिबकलें दुःख भोळें ओल्या उजेडांत.

पिकोनियां फळांविणा पानें गळलींत,
वठलेलें जिणें आहे बैसलें जागत.

षोडशीच्या लज्जेपरी पालवी लालस
फुटायची आज आहे फिरून उरास.

शहारते संथ जळीं निळीकाळी खंत
नादवेणा मौनांतली हुंकारे वेळूंत !

८·१०·५३

# विचित्रसें दुःख

आहे गुणगुण,
        आहे मिणमिण,
खंगतात रंग अस्ताचलांतून ;
केवळ धूसर शून्य नादहीन.
किटतात पर्णें
        जिणें जीवघेणें,
जगती मुक्यानें फांद्यांफांद्यांतून,
काळोखी कवेंत हालतात म्लान.
कुठें पावलांत,
        कुठें सावुलींत,
घोटाळे रेंगाळे दीनपणें श्वान
नको आहे त्याला दाटणारें मौन.
पथ रिक्त होती,
        गळे दाटताती,
उरे झुरणारी ओठीं गुणगुण ;
विझणारी पुढें तेवे मिणमिण.
ठिणगी विझतां,
        पंगू झालें आतां,
विचित्रसें दुःख भोगितां गगन.
तेंच लुकलुके नक्षत्रांमधून !

११·१०·५३

# झरे निळी सर

स्वप्नीं चंद्रगौर झरे निळी सर
अंगीं ओथंबते धुंद ओलसर.
अहा अंतराळ यक्षजळापरी
निथळून येतें दिशांसह उरीं.

मौन ओलावतें शब्दांतून सैल,
अंतरंगीं गुंगे नवलून खोल;
करी अंगलगी स्वप्नधुंद शून्य;
क्षणीं फुलारतें मिठींत लावण्य.

कथा व्यथांतील होतात बोलक्या,
गातात अभंग होऊन साळुंक्या.
स्वप्नीं चंद्रगौर मिटितां पापणी
मीच माझ्यांतून जन्मतें देखणी.

११.१०.५३

## गंध

हिरव्याशा गवतांत
        हळदिवीं फुलें,
हलकेंच केसरांत
        दूध भरू आलें.

उभ्या उभ्या शेतांमधें
        सर कोसळली,
केवड्याची सोनफडा
        गंधें ओथंबली.

बकुळीच्या आसपास
        गंधवती माती,
उस्कटून रानपक्षी
        कांहीं शोधिताती.

३·१·५४

# तिचा नवसाचा गर्भ

लक्तरल्या वक्षाखालीं
वांझ ऊर चोळामोळा ;
त्यांत रुते जळपरी
लालपांढुरका डोळा.

गल्लाभरू नजरेच्या
किटें सारविल्या कडा,
कळपाच्या गंगावनीं
डुले कागदी केवडा ;
अर्धमेल्या ओठांतला
रंगस्मितें भरे तडा,
नशिबाचा हिशेबच
असा—
केसांमध्यें भांग तिढा.

एका-अर्ध्या पदक्षेपीं
गल्लीगुंड भोतीं गोळा :
मेंदीगढूळ हातांत
रुपयाचे आणे सोळा.

दिसमास मांसांतून
आटे रक्त मासातोळा ;
त्यांच्या
शीळभरू विड्याखालीं

लाळघोटा फिल्मी सूर :
तिच्या
(कवडींत मावणारा)
नटरंगा येई पूर.

चुंबनानें भाजणारी
विटे पितांबरी ओवी ;
त्यांच्या कानीं
अमृतानें ओथंबते
तिची दिगंबरी शिवी.

पळसाच्या पानांवर
झुले तिचा भाग्यलेख,
तुळशीच्या आसपास
कुंकुमते
तिच्या भाळीं मात्र खोक
आणि—
वेदव्याली खिळेठोक.
कापी
तिच्या लुळया काळजास
त्यांच्या वासनांचा दर्भ ;
अहो, कुणीं जिरविला
तिचा नवसाचा गर्भ !

दिवसास
        आसपास
उन्हें लख्ख दारोदारीं
साबणाच्या फेसापरी
                फेसाळतां,

अनुक्रम वि: काव्य
क्रमांक नों: दि

आसपास
बंद बाऱ्या असतांना,
रंग ओठां नसतांना,
गंध फुलां असतांना,
ढेकणांच्या खाटेवर—
मऊ उशी
(तेवढीच
अपापराशी)
भिजतांना,
आवरून आसूंपान्हा,
मऊपराग हातांनीं
तिनें विणिलेला कधीं
जुईशुभ्र अऱ्यावर
गोमटासा बाळ तान्हा.

पुढें मागें रात्री...रात्री
राही कोरडीच कूस;
गात्रीं...गात्रीं...मूक वेणा
त्वचा झाली फक्त घृणा.

ऑगस्ट, १९५४

## ओझें

शिळया शितांवर
आहे हो लक्कर,
उघडी मलीन गोरटीशी मांडी ;
उभी रस्त्याकांठ नरा तुझी मादी !

डोळ्यांतली ओल
पांघरिते खूळ,
कानीं येतां शीळ
लगबग जाते ;
आंतड्याचा पीळ काळोखांत तुटे,
फडक्यांत झाले अन्नाचेही कांटे !

कुठें वडापास
जाते विसाव्यास,
तिथेंही फुंकिती कुणी सांजवात;
कुणी म्हणे तेथें, "कण्हे दिवाभीत."
गोमटें गुपीत
कुशींत सोशीत
कुठें रावुळांत भाकिते माउली,
"मला नवमास दे देवा सावुली !"

झोळींत तान्हुलें
        आज हिंदकळे :
ओझेंच आतां अन् आहे याहीपुढें ;
कुढत अंधारीं वाढेल बापुडें !

ऑगस्ट, १९५४

# तुझें मन

तुझें मन आहे
अजून
एका जुईच्या
कळीनें
ठि...ब...का...य...चें.

तुझें मन आहे
अजून
एका नांगीनें
मधाच्या
ठणकायचें...

तुझें मन आहे
अजून
एका कलेनें
चंद्राच्या
आकळायचें.

तुझें मन आहे
अजून
एका दुसऱ्या
मनानें
ड...च...म...ळा...य...चें.

तुझें मन आहे
अजून
एका उद्गाराच्या
उद्रेकानें
प्रश्नांकित...

तुझें मन आहे
अजून
एका तुझ्याच
'मी'पणानें
तुझेंच तुझेंच फक्त.

नोव्हेंबर, १९५४

# इथेंच

इथेंच
फक्त इथेंच
आहे खुंटीवर टोपी
पुराणजिप्सीची टोपी.
आहे गजांवर डोळा
कैद्याचा लोंबता डोळा.
आहे मेजावर ग्रंथ
उडाणटप्पू गबाळग्रंथ.
आहे कौलाकौलावर झेंप
भकासभिंगाची
झेंप.
आहे खोलीभर जांभई
किटेल्या शून्याची जांभई.
आहे छातीभर
गजर—शिळया जन्माचा गजर.
मनगटावर गजरा
कोमेजल्या बकुळीचा गजरा.
आहे नाडींत जागर
लुळ्या मरणांचा जागर.
आहे फोटोंत पाल
भुताच्या मनाची पाल.
चुकचुकते
माझ्या चष्म्यांतल्या
म्हातारीचे कुरतडीत गाल
कोण ? काय ? कुठें ?
? ? ? ? प्रश्न प्रश्न प्रश्न

पुटपुटते म्हातारी
कृष्ण...कृष्ण...कृष्ण !

नोव्हेंबर, १९५४

# काळोखाची गांठ जिवाला

केव्हांपासुन चढते आहे
सघन घनांतुन कोर हिमानी,
केव्हांपासुन ठणकत आहे
खोल तमांतुन बधिर चांदणी;

केव्हांपासुन झपाटतें हें
आकाशाचें मौन दिगंबर,
वेळूंमधुनी घुमतें आहे
अन् वाऱ्याचें आर्त कबूतर;

केव्हांपासुन बसते आहे
काळोखाची गांठ जिवाला,
केव्हांपासुन जडते आहे
शद्बहीन ही खंत मनाला!

मार्च, १९५५

# नशेंत कस्तुरी

निजसुऱ्या कळ्यांमध्यें
गंध ओथंबून आज उमले दारांत
फुलांचा शकून.

आज कंकर शिर्शिरे
केशरी तोऱ्यांत, झिंगे उधाणून रंगीं
न्याऱ्याच ढंगांत.

आज आंब्याच्या डहाळ्या
डोहाळेधुंदींत फळें गारफी गालांचीं
घोळीत मनांत.

कथांब्यांत गोरट्याशा
फुलसरे चोरट्यानें छपवून कळ
रसबाळी केळ.

आज उमेदीची पोरी
भिवयांच्या कोरी जरा उंचावून चाले
नशेंत कस्तुरी.

१७.६.५५

# आणि ओठांत जांभई

शुभ्र मिजास जुईची
उसवली तरी,
आणि आरास भुईची
ओसरली तरी,
आज आली ना अजून
आंब्यावर खार :
आला आहे पिकोनियां
तुट्टं फळभार...

आतां निळींत चांदणी
फुटूं आली तरी,
आणि ओठांत जांभई
दाटूं आली तरी,
आज आल्या नाहीं कशा
चिमण्या बारींत ?
डाळिंबाचे दाणे लाल
बावले बशींत...

ऑगस्ट, १९५५

## आड येते रीत

नाहीं कशी म्हणूं तुला, म्हणतें रे गीत ;
परी सारें हलक्यानें : आड येते रीत.

नाहीं कशी म्हणूं तुला...येतें, जरा थांब ;
परी हिर्व्या वळणांनीं जायचें न लांब.

नाहीं कशी म्हणूं तुला, माळ मला वेणी ;
परी नीट, ओघळेल, हासतील कोणी.

नाहीं कशी म्हणूं तुला, घेतें तुझें नांव ;
परी नको अधरांचा मोडूं सुमडाव.

नाहीं कशी म्हणूं तुला, मांडूं सारीपाट ;
परी नको फार वेळ...दूध उतूं जातं...

नाहीं कशी म्हणूं तुला, जरा लपूंछपूं ;
परी पायां खडेकाटे लागतात खुपूं.

नाहीं कशी म्हणूं तुला विडा रे दुपारीं ;
परी थोरांच्या समोर घ्यायची सुपारी.

नाहीं कशी म्हणूं हिर्व्या पदराचा शेव ;
परी हळू माप निळ्या डोळ्यांतला भाव.

नाहीं कशी म्हणूं तुला हातीं घ्याया हात ;
आले वाटतें भावोजी घेऊन गणीत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........

नाहीं कशी म्हणूं तुला, लावितें मी दार;
परी नाहीं दाराचा या नीट अडसर.

नाहीं कशी म्हणूं तुला, जाऊं चांदण्यांत;
परी पहा, दिसे छान चंद्र खिडकींत.

नाहीं कशी म्हणूं तुला पहाटमागणी;
परी घालायचें आहे तुळशीस पाणी.

नाहीं कशी म्हणूं तुला, म्हणतें रे गीत;
परी सारें हलक्यानें : आड येते रीत.

१८.८.५५

# कांपऱ्या हातांनीं

कांपऱ्या हातांनीं लिहिलें तोतरें,
मुके शब्द शब्द बधिर बहिरे ;

थोडेंसें गगन कडू आणि काळें,
अर्धेंच औषध घशांत राहिलें.

सनईचे सूर तीक्ष्ण पर्णोपर्णीं
विळखा घालून डंख देती मनीं.

उलट्या पायांनीं पिशाच्च चालतें,
ठिगळें जोडीत आसवें ढाळितें.

मरणाचा अर्थ तोकडा मिळतो,
कातरवेळेला घर लुबाडतो...

१८.८.५५

# जाईजुईची जांभई

अशी येते कधींकधीं
भोळी भोवळ मनास,
हिर्व्या चुड्याहून धीट
तुझ्या विड्याची मिजास.

अशी येते कधींकधीं
केतकीनें उसासून
तुझ्या पदराची भूल
लाल ओठांहून ऊन.

अशी येते कधींकधीं
तुझ्या गारफी गालांत
स्मितचंचळशी खार
मला पुरा झपाटीत.

अशी येते कधींकधीं
तुझ्या गौर गोलाईंत
निळाईच्या नशेमध्यें
गैरपणें जरा रात.

अशी येते कधींकधीं
झुंजुमुंजू रेशमांत
जाईजुईची जांभई
तुझ्या नवाईची सुस्त.

ऑगस्ट, १९५५

## गतस्मृतींचा कापुरपेला

जराच दिसली कोर फटींतून
आणि निसटली पोर दिठींतून ;
झपाटलेला तीळ गालिंचा
जातां जातां गेला झोंबुन.

जराच फसला पदर पोपटी
किंचित हसली लालस लंपट ;
जराच झुकली नशा ओठिंची
आणिक चुकली दिशाहि धोपट.

जराच फिरली किनखाबीची
सुई जुईचा उसवित शेला ;
आणि ठणकला गतस्मृतींचा
काळोखानें कापुरपेला.

नोव्हेंबर, १९५५

# तुझ्याभोवतीं

असेच फसले होते हेतू
तुझ्याभोवतीं भोवळतांना,
असेच फसले होते डोळे
तुलाच सगळी साठवतांना.

फसली नाहीं तुझी पापणी
ढाळित असतां तमीं चांदणी;
फसले नाहीं अधर जराही
घालित असतां फुंकर मौनीं.

गाठित होतिस क्षितिज मुक्यानें,
मुकेंच होतें क्षितिज परंतु;
तुझ्याभोवतीं भोवळतांना
म्हणून फसले होते हेतू.

नोव्हेंबर, १९५५

# मातीची अंबारी

मातीचा पामर मी
उंबरठा आरासुन
सोन्याच्या कांट्यांचें
जपतों मी नित कुंपण.

मातीचा पामर मी
नियम-रीत सांभाळुन
तडफडत्या प्राणांना
जोपासित कुर्वाळुन.

मातीचा पामर मी
कळस नवे उंचावुन
साठवितों परमेश्वर
समईच्या वातींतुन.

मातीचा पामर मी
लख्ख निळ्या सीमांतुन
पोळतसें हुंकारत
आकाशा ओवाळुन.

मातीचा पामर मी
रिक्त मुठी आवळून
ठेचाळत मातीला
वादळतों रक्ताळुन.

मातीचा पामर मी
जगण्याचा कैवारी:
वाहतसें उद्घोषित
मातीची अंबारी.

३·१·५६

# आणि विजेचा देठ तुटेना

जमतें आहे ढगांत पाणी,
वीज वाकते करित उताविळ,
ढळतां ढळतां सांज सुरंगी
उठे दिशांतुन वांझ भुतावळ.

जमतें आहे ढगांत पाणी,
कळसापाशीं पळस पिसाटे;
वावटळीनें राउळघंटा
घणघण गाभाऱ्यांत घुसमटे.

जमतें आहे ढगांत पाणी,
दुखतो फांद्यांमधल्या सांदिंत
क्षणाक्षणानें असा काजवा;
पाचोळ्याला भोवळ येत.

जमतें आहे ढगांत पाणी,
अजुन परंतू ढगचि फुटेना;
आणि विजेचा जराजराही
त्या पाण्यांतुन देठ तुटेना.

१९.३.५६

# अशक्याला लांबी

दुःख नाडीबंद
चौकट अरुंद ; अश्रूंना शिवेना
रक्त लालबुंद.

परांत झोंपला
सुस्त राजहंस ; दिव्यांत विझली
प्रकाशाची कूस.

काळीनिळी हवा—
गगन संपलें ; उलटी कमान
क्षितिज तुटलें.

भित्री भागुबाई
दूरच्या जन्मांत होणार बाहुली
वाघाच्या डोळ्यांत.

दुथड्या सुखांत
वाळू आणि वाळू...उतरे किनारा
चित्रांतच खेळूं.

एखादाच मोती
पोशीत शिंपला ; इतर ठिकाणीं
खुंटी आणि खिळा.

ढोलींत बैसला
कावळा गोठून, ढवळा दिवस
मनीं साठवून.

कुठें आहे कोण ?
कुठें नाहीं कोण ? अशक्याला लांबी
असते सुजाण.

एप्रिल, १९५६

# अशक्याला लांबी

दुःख नाडीबंद
चौकट अरुंद ; अश्रूंना शिवेना
रक्त लालबुंद.

परांत झोंपला
सुस्त राजहंस ; दिव्यांत विझली
प्रकाशाची कूस.

काळीनिळी हवा—
गगन संपलें ; उलटी कमान
क्षितिज तुटलें.

भित्री भागुबाई
दूरच्या जन्मांत होणार बाहुली
वाघाच्या डोळयांत.

दुथड्या सुखांत
वाळू आणि वाळू...उतरे किनारा
चित्रांतच खेळूं.

एखादाच मोती
पोशीत शिंपला ; इतर ठिकाणीं
खुंटी आणि खिळा.

ढोलींत बैसला
कावळा गोटून, ढवळा दिवस
मनीं साठवून.

कुठें आहे कोण ?
कुठें नाहीं कोण ? अशक्याला लांबी
असते सुजाण.

एप्रिल, १९५६

# रिती कां हो ?

सांजमग्न पाल्यावर
मऊ झाले जरा डोळे :
उतरले शाप सारे,
चंद्राहून शितळले.

मानेखालीं कुठें कुठें
डवरून आतां घाम :
आरामाच्या कानगोष्टी,
सारें सुस्तावलें धाम.

अशा प्रपंचाच्या खुणा
लाजविती हळुवार
उन्हा. तृण माजतांना
कानीं शिरतें हंबर.

असें घडे लक्ष वेळां ;
दारीं उभी गौरधेनु...
अजूनही रिती कां हो ?
दूर गोपाळाची वेणू.

एप्रिल, १९५६

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम २५६०२ वि:
क्रमांक १४४२ नों: दि:

# मिठी

अशीच असते मिठी
मरणाची लांबण दूरवर रचणारी
दिव्याकाजळाची...
प्रसववेदना मात्र तिथें तेवत असते
गात्रगात्र पोखरीत...
जगणाऱ्यांच्या कलेवरांना
दोन स्तनांचीं नातीं जोडून देणारी
घट्ट मिठी.
याच मिठीचा अर्थ असा कीं
पाश हिचा सोडवितांना डळमळती
डचमळती कुंभ विजेचे
आळविती फिरुन फिरुन याच मिठीशीं
घट्ट धरून ठेविण्यासाठीं.

मे, १९५६

# कपाळाला अर्धी आठी

बंद झाल्या दारापैल
उस्नी छाया : थोडी तनु ;
कुठें त्वचेचा आरंभ ;
कात टाकिलेला अणु ?

एखादेंच गूज द्रवे
स्वातीसाठींच आळस ;
आणि इतर वेळेला
कान आधार तेलास.

मानकरी थुंकीमुळें
फळ राहिलें रसाळ ;
देठांहून किती छोटी
बेंबी झालीसे गबाळ ?

दंव खोटें म्हणूं नये
टपटपे फांदीपोटीं...
उंचावून चष्मा ; पडे
कपाळाला अर्धी आठी.

१.६.५६

# सांगावया वाटे लाज

रुजू झालें रुजावया
चोंचींतलें शिळें बीज ;
बरळून मेली आहे
मांसांतली निळी नीज.

आंसवांना केस आले
पापण्यांची कृपादृष्टि ;
पाचोळ्यानें रखडतां
काष्ठ झालें आहे कष्टी.

डोळ्यांतल्या कुसळाला
फुटोनियां लाल पाला ;
सांगावया वाटे लाज
बर्फ थोडा ओलावला

१.६.५६

## जन्म गेले तरी न्हातें

मनस्मरणीचे मणी
इथेंतिथें पघळले ;
सुट्यासुट्या मण्यांतून
इंद्रधनू ठिबकलें.

झाली धन पोकळीची,
उदासल्या यमकांची ;
ध्रुवपदापास यात्रा
चोळामोळा पाकोळ्यांची.

कुठें नक्षी उसवून
परागंदा झाला पारा !
घरळ्याच्या पक्ष्यासाठीं
थोडा तरी हवा वारा !

ओलीं उमळून आलीं
डोहावर रिक्त भुतें,
परी शब्दांत मालिन्य
जन्म गेले तरी न्हातें

२.६.५६

# सुख

अर्थ आला प्याया सारें
मिळाला न माझा ओठ;
सुखें उरलासे तेथें
मुळाहून कडू घोट.

२·६·५६

# सीमेवर

अर्थ अनंताएवढा,
कोरडेंच आहे बूड ;
सांधेजोड साधतांना
भाबडीच राहे कूड.

शिडें फाडावया गर्जे
वादळाची किर्र दिशा ;
खांद्यावर ठेवी सज्ज
रहिवासी काळा गोषा.

सीमेवर न्हातेंधुतें
सोंग नागडेंच उभें ;
कधीं हलतील ; भोळीं
पाण्यांतलीं प्रतिबिंबें !

४.६.५६

# तुझ्या मार्गींची पथारी

आतां तरी ओढ प्रभो !
पायावरी पांघरूण ;
नको घालूं गिधाडांना
तुझ्या मुठींतला प्राण.

लिहिलेले क्षण भाळीं
ओल्या कृपेनें भुकेले ;
गोधडीचे टांके देवा
माझ्या मर्जेनें गुंफले.

जटायूचें रक्त कुठें
एखादीच नाडी जपे ;
गुंतावळ झालेली ही
त्यांत कुठें तरी खुपे.

विझवून ओंजळी या
झाडलोट कर सारी ;
सोडीन मी केव्हां तरी
तुझ्या मार्गींची पथारी.

९.६.५६

# थबकलों

थबकलों प्रारंभाशीं
रिकामाच मूर्तिमंत ;
विझोनीच आला हातीं
तेथें वातड शेवट.

चुकवितां शिणलेली
कूड झोपेंत कुठेंशी ;
ओसाडसा कवडसा
काच फोडीत कौलाशीं.

भटकून काच घेते
भोवळून आरशाशीं ;
चित्रबांधणी गुंफून
दिवा झोकीत भिंतीशीं.

गुंतलासे तिथें कोण
माझ्यादेखत अदृश्य ?
पीळ पडतच विझे
माझें सांगून भविष्य !

९.६.५६

# पाप इमानी

कधींच वठला आहे नूर
देंठ फुलांचा दुखे उगाच;
कधींच झडलीं परें पारवीं
उगाच खुपते आहे चोंच;

कधींच झुकला आहे सूर
उगाच चढते तार गळ्याशीं;
कधींच हुकला आहे नेम
उगा रुते हा तीर उराशीं;

कधींच ओसरलेला पूर
उगाच वाळुंत शिंप हिमानी;
जपते...जपते केव्हांपासुन
तांबुस लाडिक पाप इमानी.

जून, १९५६

# झाडें नग्न झालीं

परत एकदां परत फिरून
पाषाणयुगांच्या नंतर एकदां
युगांच्या मोलाचा लाल ग्रीष्मगर्भ
राठ वल्कलांत जपतां जपतां
झाडें नग्न झालीं.
माती झाली लाल, पाणी झालें खोल,
झपूर्झा घालीत आल्या वावटळी,
फांदी फांदी झाली कृश नि विव्हळ,
क्लांत नि उजाड जाहला कोयळ.
पानांपानांतून कोवळ्या खारींचें
ऊनऊन रक्त चढ़ूं उतूं आलें;
खोल मुळांतून झाडांनीं विजेचें
मातीच्या मर्माशीं पुकारिलें बंड;
वृषभांना आलें पीडापुष्ट बळ,
उकरूं लागले कढत शिंगांनीं
भेदरली भुई;
आणि परत एकदां परत फिरून
झाडें...नग्न...झालीं...

जून, १९५६

# अंतापास

गोड गडे आरंभाचा 'श्रीगणेशाय' इवला;
अंतापास अज्ञ आहों पंतोजीचा नाहीं डोळा.
वरकूल सहवासा आसूंहासूंस पुरेल;
काळजाच्या ऐलपैल तारा एखादा तुटेल.
सुटकेचा नको श्वास नको आतांच सोडूंस;
आहे अजून पांगळा तुझामाझा गर्भवास...

जून, १९५६

# पाला

साऱ्या सरळच वाटा
भुईसपाट
सपाट जाणाऱ्या.
क्षितिजांच्या पावुलांची
नाहीं नाहीं सांडलेली
कुठें दंवखुणा.
दिसतात विझलेलीं
पांगाऱ्याचीं फक्त फुलें
आणि राठ कांटे.
जिथेंतिथें
झाडेंही वितात फक्त
बकरीचा पाला हवा तेवढा.
कसा लपणार चंद्र इथें...

जून, १९५६

## रात्र रक्तभरतीची

नुक्ती कुठें
रात्र होते आहे नुक्ती कुठें
        रक्तभरतीची,
तुझ्या स्वच्छ ताज्या सुखाची,
माझ्या मावळत्या दिवसाची,
फक्त ओहोटीची
रात्र...होते...आहे...

जेव्हां येणार नभाला सर निळी
ग, सळसळून
नक्षत्रांची,
तेव्हां
तुझ्या मऊ शुभ्र शेजेपास
नाचणार गडे
काळोखाचा मत्तमोर,
आणि माझ्या दाटल्या ढगांत
जळणार
कापूरगोरी ग चंद्रकोर,
आणि मिटणार
—माझ्याभोंतीं
लाख लाल संज्ञाज्योति तेव्हां
तुटणार—अथांग रक्तावर बांधिलेला
तुझ्या बाहूंचा माझ्या देहाचा
तूं-मीचा सेतु,
तुझ्या सुखाच्या मध्यरात्रीं
...ऐन मध्यरात्रीं.

नुक्ती कुठें
रात्र होते आहे नुक्ती कुठें
रक्तभरतीची...

जून, १९५६

# इथें सरे...तिथें उरे

पाणी अपुरें पावुलां
वाळू होते गळाभर ;
होतें कांठाशीं जीवन
मापी दिगंताचा पूर

बुडत्याचा हात वर,
हातीं ऋण जिंकल्याचें ;
डोळ्यांपुढें सूख दाटे
सारें कांहीं आटल्याचें.

कुठें शीड कुठें वारा,
उभी सुन्न डोलकाठी ;
'अथांगाला थांग आहे'
म्हणतच तळ गांठी.

नाहीं चांदणीला बळ :
जिथें झुरे तिथें विरे ;
नाहीं अंत किनाऱ्याला :
इथें सरे तिथें उरे...

४.७.५६

# तुझा किनारा

तुझा किनारा तुलाच माहित
किती निखळतो क्षितिजापासुन;
इथें सारखी ठिणगी फुटते
या वाळूच्या कणाकणांतुन.

साठवणीनें कळीकळीच्या
मी कांट्यांनीं पिडलों आहें;
पाचोळ्यानें झाड ठिगळतां
मीच कितिकदां वठलों आहें.

पंख चोरुनी घार मनाची
पिंड पिसांतुन सोसत आहे;
अन् घरट्याची काडी काडी
हुंकारानें ठणकत आहे.

किटती डोळ्यांतून बाहुल्या
निघतां सोलुन तमीं चांदणी;
खचूं लागल्या घुमटामधुनी
येते विव्हळ उतूं विराणी.

इथें असा हा लासत पोळत
खुडून घेतों मीच मला; अन्
तुझा किनारा तुलाच माहित
किती निखळतो क्षितिजापासुन.

५.७.५६

# माळ ओसरे

हिरव्या माळापुढें निळा गिरि
गिरवित काळीं वळणें कांहीं;
छप्पर झालें लाल अधीकच,
धूर दरींतुन चढतच नाहीं.

पुसून गेलें गगन खोलवर
कांठावरतीं ढग थोडासा;
थोडासा पण तीच हेळणा :
पिवळा झाला फक्त कवडसा.

हिरव्या माळापुढें निळा गिरि
मावत नाहीं इतुका फिक्कट;
झुकत चालली पुढेंच टिटवी
माळ ओसरे मागें चौपट.

५.७.५६

# वेदना

अशी प्रसववेदना
        तेवतांना
रक्तीं रक्तीं
कंपाकुल गर्भगांठी
        सोसतांना
        थिजे माय :
वाढतच आहे
माणसांचें मोनें कूळ,
पुढें व्हाया बघे
        जन्मापार ; परी
पायांवर पेंगे बळ :
माणसांचें मोनें कूळ.

जुलै, १९५६

# हांसायाचें आहे मला

कसें ? कसें हांसायाचें ?
हांसायाचें आहे मला,
हांसतच वेड्या जिवा
        थोपटीत थोपटीत
फुंकायाचा आहे दिवा...

        हांसायचें
कुठें ? कुठें आणि केव्हां ?
कसें ? आणि कुणापास ?
इथें भोळ्या कळ्यांनाही
आंसवांचा येतो वास...

जुलै, १९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 10582

# डाग पडे चंद्रा

मालवली
देखतां देखतां
डोळ्यांपास मिठी धुंदपणें...
चाळवली
मिटतां मिटतां
हर्षगर्व दिठी मंदपणें...
आर्जवाचें
तुटलें अंतर
मनामनांतून संथपणें...
मोकळ्यानें
फुलूं झुलूं झाल्या रक्तजास्वंदीच्या
कळ्या ऊन ऊन
नग्नपणें...डंवरली भोळी भोगतंद्रा...
अमृताचा डाग पडे चंद्रा...परी म्यां पाहिलें,
जहालें दुथडें चुंबनउष्ट्या पापण्यांत मीठपाणी.
मालवली देखतां देखतां डोळ्यांपास मिठी...खिन्नपणें.

२९.७.५६

## देण्यासाठीं—घेण्यासाठीं

तुझीमाझी ताटातुटी
अटीतटीची नव्हेच ;
फक्त
खेळीमेळीची फुलत्या,
क्षणाक्षणांची सरत्या ;
नव्हेच
रागालोभांची भलत्या ;
फक्त
झोपाळ्याची ग झुलत्या ;
नव्हेच
जन्मजन्मांची सलत्या ;
फक्त
राधेच्या गुण्यागोविंदाची,
नव्हे कसल्या बाधेची...

उधळून
जावा असा द्यावा असा
तुझामाझा संग होता ;
भुलत्या ग स्पर्शांचा
त्याला भारी गर्व होता ;
उधळून
जावा असा व्हावा असा
उभारीच्या हर्षाचा या
दाहीदिशा वारावारा.

गांठीगांठी
उसवतां
झाल्या कळया उघड्या ग.

आणि
शुभ्र धागऱ्यांच्या निळ्या
किनारींना
शिवूं आलें इंद्रधनू :
पिंगा आला ग उधाणूं.
माती लाल होतां होतां
गोऱ्या गोऱ्या देहकळ्या
झाल्या... झाल्या उमलतां
बावोनियां चोळामोळा :
मावळल्या फुगड्या ग.

स्वप्नें... स्वप्नें
विरघळून जातांना
देंठापाशीं पानें होतीं,
कांठापाशीं रात्र होती ;
मनें... मनें
कुस्करून ओसरतां
फुलांपाशीं फळें होतीं,
पहांटेला फक्त केशरी
धुक्यापाशीं पळें होतीं ;
तूं-मी मी-तूं
दूर दूर सरतांना
सारें कांहीं तृप्त होतें,
पक्व होतें ;
हेंहि सारें

तुलामला प्राप्त आहे
देण्यासाठीं...घेण्यासाठीं...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वल्मत.
अनुक्रम २४८०२ वि. काव्य
क्रमांक १४४२ नों. दि. १५।११।५८

ऑगस्ट, १९५६

जोगवा : ५५

## कधीं विझूं गेली नार?

ढळे पुन्हा पुन्हा धीर,
लागे पुन्हा पुन्हा दार,
पुटपुटे तम भोंतीं
"जन्मांधाला पोरें फार."

गुंडाळून ठेवूं डोळे
दूर आंसवांच्या मागें;
बिळें लिंपून गुहेचीं
खोलूं दिगंबर सोंगें.

वाळूं गेली शुभ्र ज्योत,
सांचूं लागे अजगर;
करकरे फार वेळां
पोलादाचें बिजागर.

पापण्यांना वीट आला
धीट झाला अडसर;
नाहीं ढिगांत वस्त्रांच्या
कधीं विझूं गेली नार?

१५.८.५६

## लेखणीला शाई

लेखणीला शाई लागे
थोडी लाल वर्षाकांठीं;
थोडा रवा सांडलेला
मरणाऱ्या मुंग्यांसाठीं.

१६.८.५६

# उन्हें बावतां निळीचीं

कुणीं कांहीं आळवावें
बाळगावी श्रद्धा मोठी ;
दूध सुकूं दिल्याविण
दुखूं द्यावी तंग घोटी.

मोहमिरा मागे वीष ;
शिंगें पांच व्यालीं तम.
सूर्यावीण जगे असा
गात्रीं साधासा नियम.

राधा झाली आहे वृद्धा
वीतभर जगतांना ;
हिर्वाकच्चा घ्यावा घांस
अशी भूक मागे कान्हा.

तरी लाल फिकी घटी
भरे गोरजमुहूर्ताची ;
दृष्टी गुंडाळावी लागे
उन्हें बावतां निळीचीं.

१७.८.५६

## कथा

कशी सोसायची तिनें
मुक्यानें मुक्यानें, व्यथा पांगळ्या उराची :
जन्माचें दुखणें...
कशी सांगायची तिनें
जगास परकी, करपल्या काळजाची
कथा दुखीमुकी.
शतमरणींची रक्षा
तिनें ओंजळून...खोल अश्रूंच्या तीर्थांत
केली कृष्णार्पण.
आज पारोशा डोळ्यांत
गुडुप काजळ ;
ओठ रंगती मुक्यानें
निर्माल्यमलूल ;
आज खिडकींत उभी
हांसे कशीबशी ;
तिला दिडकीस मागे
कुणी परदेशी.
आज अत्तराचा फाया
खोंचून कानांत...कुजणाऱ्या काळोखांत
उशी परतीत.
झडे भल्या आभाळाची
नीळ भळभळा...तिच्या उरीं उठे किटे
वळ काळानिळा...

ऑगस्ट, १९५६

## फेडुन घळली

सखी पारखी होतां होतां
उसनें देई मज परकेपण ;
जपतां जपतां इथें मोगरा
फेडुन घळली जुई गंधऋण.

शिंपण झाली होती जेव्हां
सुस्त सुखाची अघळपघळशी ;
दुखली होती खोल बाहुली
काजळरेखांतून जिवाशीं.

माझ्यापाशीं नव्हतें कांहीं :
दुरून जगणें होतें केवळ ;
आरशांतले महाल सारे
उल्लंघुन मज आली भोवळ.

सखी पारखी होतां होतां
घेत हिरावुन अथांग मीपण ;
फक्त किनारा पायांखालीं
दिसतें थोडें क्षितीज—लांबुन.

२०·८·५६

## प्रारंभापासोन

प्रारंभापासोन प्रारब्धापर्यंत
शेवटला शब्द गिरवूं लयींत.
आलिया भोगाशीं ताणोनियां तंबू
सिग्नलाची वाट पहावया थांबूं.

एकाच रांगेंत बसूं आणि उठूं
टाळ खलबत्ते समभावें कुटूं ;
स्वभाव आपुला निश्चयाचें बळ
अंतरींचा मळ अंतरीं राखील.

कानींच आपुल्या अनंताची शिटी ;
कडू झाली आहे आरपार दिठी ;
अजूनही थोडी जीभ आहे लाल
(असों दे तेवढी भुकेस) रसाळ.

२१.८.५६

## लिहून थोडें

लिहून थोडें लहान व्हावें
पघळावें अन्
जीवकळेला.
जीभ मालवुन घ्यावी कंठीं ;
अथांग व्हावें
श्वासाश्वासांतून तळाला.

२२.८.५६

# काय नराच्या बेंबीमधुनी

काय नराच्या बेंबीमधुनी
द्रवेल केव्हां धुंद कस्तुरी ?
जनावरांच्या शिंगांमधुनी
लकेर घेइल कधीं पावरी ?

काय कुणाला द्यावें-घ्यावें
नोंद न झाली कशी आजवर ?
कोणी लटके, कोणी भटके
इकडुन तिकडे या कांठावर.

या कांठावर दो पायांचें
भान सुटावें असेंच पाणी ;
असेंच पाणी प्याल्यावरतीं
घुसमटून जिभ होते मोनी.

२८.८.५६

# पेंग येते चांदणीची

समईच्या शुभ्र कळ्या
उमलवून लवतें ;
केसांतच फुललेली
जाई पायांशीं पडते.

भिवयांच्या फडफडी
दिठीच्याही मागें-पुढें ;
मागें मागें राहिलेलें
माझें माहेर बापुडें...

सांचणाऱ्या आंसवांना
पेंग येते चांदणीची ;
आजकाल झालें आहें
विसराळू मुलुखाची.

गांठीमध्यें ग जिवाच्या
तुझीं आंगाऱ्याचीं बोटें ;
वेडी उघडाया जातें
उगा केतकीचें पातें.

थोडीं फुलें माळूं नये,
डोळां पाणी लावूं नये ;
पदराच्या किनारीला
शिवूं शिवूं ऊन ग ये.

उगा बावरतें मन
        भरूं येतांना केसर ;
अशा वेळेची वाटतें
        अंगावर घ्यावी सर.

डोळ्यांतल्या बाहुल्यांनीं
        घरींदारीं उतरावें,
असें कांहींसें वाटतें
        याला कसलीं ग नांवें ?

हांसशील हांस मला,
        मला हांसूंहि सोसेना ;
अश्रू झाला आहे खोल,
        चंद्र होणार का दुणा !

१३.९.५६

# पापणीच उष्टी

जागृतीचा दीस जागलाच नाहीं,
दुःखासाठीं रात्र थांबलीच नाहीं.
थाटलेला होता महाल जांभळा,
उगवला नाहीं कुठेंच उंबरा;
एकाच विटेनें अपुरी ही भिंत;
खुपली कुठेंशी खपलींत ज्योत.
उडाला शिंतोडा शेंबड्या मनाचा,
तोच जपतांना थकलीसे वाचा.
जीभेवर हांक पैलतीर काळा;
अपुराच आहे दिशागोफ निळा.
नरयोनी मोनी आहे कुणासाठीं?
सारें पाहोनियां पापणीच उष्टी!
जागृतीचा दीस जागलाच नाहीं;
घुडांत कोंबडा बोबडाच राही...

१३.९.५६

# ढग लागून जिव्हारीं

आली सर गेली सर,
रिकामीच राही चोंच ;
गढूळलें कुठें जरा
आडोशाला डबकेंच.

श्रांत झाला नाहीं संथ,
ऋण नाहींच फिटलें ;
माळावर जरा कुठें
तृण नाहींच वांकलें.

दाटलेली अजूनही
काळी गळ्यांत ओकारी ;
कुणावर फिदा झाला
ढग लागून जिव्हारीं ?

१·१०·५६

## गिरकी जाते कळसापरती

चिरा लाल नी सिमेंट ढवळें
त्यांतुन फुटते डहाळ हिरवी;
कळसाआधीं भिंत अनावर
दचकुन होते इथें ओणवी.

घुमावयाचें गगन खोलवर
तिथें चिमुटभर घुमतें गाणें;
तुटते चिंधी जखमेवरची
आणिक उरतें संथ चिघळणें.

चिरा लाल नी सिमेंट ढवळें
त्यांतुन कैसे निघतिल बगळे?
म्हणून माझ्या पायधुळीची
गिरकी जाते कळसापरती...

२.१०.५६

# तुझ्यावीण तुझ्यापास

आजवरी भांडलों ना
आतां आहे भांडायाचें :
भांडें काचेचें निर्मळ
पुढें तुझ्या मांडायाचें.

टाहोपरी फोड भांडें,
लाळेपरी गीळ काचा ;
नाहीं तर सोड फेड
तुझ्या लज्जेचा रे ओंचा.

मला आहे पुरा ठावा
तुझ्या पापणीचा भोग ;
धरिलास कां रे देवा,
माझा असंगाचा संग !

मेल्याहून मेला झालों
जन्मा येतांनाच मागें ;
तुझ्यावीण तुझ्यापास
भुतावळीचीं गा सोंगें...

३·१०·५६

## लक्ष लक्ष

लक्ष लक्ष तूं
अन् लक्ष लक्ष वेळ...
मी एक अनंताचा चुकला कुणी.

लक्ष लक्ष वेळ तुला
रिकामीच पाठवावें;
लक्ष लक्ष वेळ तुला
सांठवावें आठवावें.

मिठी पडतांच तुझी
तुझ्याहून दूर व्हावें ;
कुण्या बाहुलीचें दुःख
तुझ्या डोळ्यांत रचावें.

पहाटेच्या कळ्यांपाशीं
थोडें मागावें इमान ;
थोडें सांगावें तुलाही
माझ्या मनाचें प्रमाण.

लक्ष लक्ष तूं
अन् लक्ष लक्ष वेळ...
मी एक अनंताचें चुकलें पाऊल...

३·१०·५६

# घोट गढूळले पुरे

हरवला कुठें कसा
एका रात्रींतच शेला ;
रंग लागलेला आहे
टिप्पणीच्या लेखणीला.

पेला भरलेलें पाणी
निळ्या छटांनीं अपुरें ;
पुटें चढतांच ओठां
घोट गढूळले पुरे.

खाट करकरे जेथें
तेथें उन्हें चाळवलीं ;
आणि उरलेलीं सुतें
सुतेंसुद्धां मावळलीं.

६·१०·५६

## लक्ष लक्ष

लक्ष लक्ष तूं
अन् लक्ष लक्ष वेळ...
मी एक अनंताचा चुकला कुणी.

लक्ष लक्ष वेळ तुला
रिकामीच पाठवावें;
लक्ष लक्ष वेळ तुला
सांठवावें आठवावें.

मिठी पडतांच तुझी
तुझ्याहून दूर व्हावें;
कुण्या बाहुलीचें दुःख
तुझ्या डोळ्यांत रचावें.

पहाटेच्या कळ्यांपाशीं
थोडें मागावें इमान;
थोडें सांगावें तुलाही
माझ्या मनाचें प्रमाण.

लक्ष लक्ष तूं
अन् लक्ष लक्ष वेळ...
मी एक अनंताचें चुकलें पाऊल...

३.१०.५६

## घोट गढूळले पुरे

हरवला कुठें कसा
एका रात्रींतच शेला;
रंग लागलेला आहे
टिप्पणीच्या लेखणीला.

पेला भरलेलें पाणी
निळ्या छटांनीं अपुरें;
पुटें चढतांच ओठां
घोट गढूळले पुरे.

खाट करकरे जेथें
तेथें उन्हें चाळवलीं;
आणि उरलेलीं सुतें
सुतेंसुद्धां मावळलीं.

६.१०.५६

# मरतां मरतां नंगें जावें

सहस्त्र वर्षें जन्म साहशिल
कूड परंतू भगवंताची ;
हाड हाड हें गुंतुन पडलें
वाळू लिंपुन गंगेवरची.

निळें न पाणी तीर्थांचें गे,
हवा तेवढा शुभ्र किनारा ;
हवा तेवढा हेंहि खरें ना ?
तिथें न तुटला अजून तारा.

कूड परंतू भगवंताची
उसनी लेवुन जग भोगावें ;
वाळू होउन गंगेवरची
मरतां मरतां नंगें जावें.

७.१०.५६

## डहाळी

रुजू झालें रुजावया
चोंचीचोंचींतलें बीज;
बीज लवतां लवतां
पांखरांची उडे नीज.

दूर उडालीं पांखरें
आणि आरासलें माळ;
रानफुलांनीं फुलल्या
तुडुंबलें डोहीं जळ.

फूलपांखरें आलेलीं
झाली भुई मधउष्टी;
पाचोळ्यानें वडावर
काष्ठ झालें आहे कष्टी.

ऑक्टोबर, १९५६

## श्वान माझ्या किरणांचें

गोंगाटाच्या गलबताशीं
लाल शिडांत लपलों ;
होत्या-नव्हत्यांचे सूर
कंठीं साहून हांसलों.

ताणोनियां तंतू थोडे
गुंतावळ सैल झाली
सर्वांसाठीं ; सर्वांभोतीं
इवल्याची भातुकली.

भोंवतांना झालों धीट,
कीट झडे रांगण्याचें ;
सर्वांच्याच पायांखालीं
श्वान माझ्या किरणांचें.

ऑक्टोबर, १९५६

## आतां रुजवण व्हावी

गीतेमध्यें जपलेलें
आहे खारीचें शेपूट ;
सारें बाळपण झालें
माझ्यासवेंच दुप्पट.

आंबा पिकलेला आतां,
दांत खारीचे वरतीं ;
व्रण नखांचे सुखानें
स्तन सखीचे जपती.

आतां व्हावी रुजवण
घटाखालीं हळुवार ;
पाणी हळदीचें घटीं
खोल भूमींत निर्झर.

३०.१०.५६

# हरवला चैतन्याचा पूत

इथें शब्द शब्द आहे जिभेचा सोहळा,
गिलाव्याची गूजभाषा सांठवील गळां ;
डोळे उथळ केवळ ओले बुडबुडे,
जपे काचेचें काळीज रेशमाचे किडे.

साडेतीन हात पुरा हाडांचा इमला,
त्यांत स्मशानशांतीची काजळते कळा ;
इथें अहोरात्र जागे वैराचा विचार,
चाकोरीचा टांक झाला थुंकीचा लाचार ;

जित्या जागत्या रक्ताचा वादळेना भोग,
सडे मनाच्या बर्फांत वासनांचा रोग ;
इथें फुलांचे हिशोब...ताऱ्यांचे करार...
होते क्षणांत मलीन चंद्रमुखी नार.

खिडक्यांच्या जगीं सजे आयन्यांचें ढोंग,
भोळ्या भिंगांत माजतें हवें तसें सोंग.
इथें शेंदुरी श्रद्धेची वांझोटीच कूस,
आणि टाळांवर उडे—तुकोबांचें—भूस.

कुठें हरवला आज चैतन्याचा पूत
मायदुधापरी ज्याचे ओठ तीर्थव्रत...

नोव्हेंबर, १९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५७०२ वि: काव्य
क्रमांक १४४२ नों: दि: २५।११।५८

# हिर्व्या चुका

हळदीचीं पानें हळदिवीं झालीं;
कुठें कोण जाणे पिंगाणीं पळालीं.

रुमडाचीं फळें झालीं रक्तबुंद;
उष्टावून पक्षी पेंगतात धुंद.

पाण्यांत बुडालें फुलून कमळ,
देंठापाशीं थोडी गढूळ चाहूल.

थांबेना पायांशीं दुर्वांतील वाट,
बावतच वळे तिढावेडा घाट.

जिथें आहे घाट तिथें आहे नार;
तिथून चढते झिंगोनियां कोर.

ओठांत अजून ठसठसे मुका;
हळदीची मूस करी हिर्व्या चुका.

नोव्हेंबर, १९५६

# व्यंग नवें स्वामी जपा

स्वामी आहें व्यंगांचा मी
लाख ठिकाणीं वांकलों ;
घोकलेलें कडू पित्त
हिर्व्या चित्ताशीं ओकलों.

गर्भवासीं न्हालेला मी
चामडीचा अपराधी :
समांतर रक्ताशीं नी
ओणवीच आहे व्याधी.

वक्र वक्र आहे चक्र ;
मौन मोडलें जनांशीं ;
टीऽही टीऽऽही टिटवीची
केव्हांपासुन उपाशी.

तक्रारीचा क्षण उभा
माळण्यास साधा चांफा,
परी खोंक पडे तेथें
व्यंग नवें स्वामी जपा !

२७.१२.५६

# मनाचा मुकुंद

हवा आहे कुंद मन नाहीं धुंद,
बांसरी मागेना मनाचा मुकुंद.
क्षितीज पूर्वेला लागलेलें ताणूं,
रूळावर गाडी लागली उधाणूं.

लागली उधाणूं बोगद्यांत दरी,
ओठांवर वाफ झालेला श्रीहरी.
अनावर कंप सले सले सुई,
भानावर नाहीं भुई तशी भुवई.

सरळ चालल्या सगळ्या गौळणी,
विकावया दूर दहींदूधलोणी.
गोकुळाची वाट कुठें सापडेना
कदंबांत लाज उघडी पडेना.

जमून साळुंकी आठविती केका
पाण्यांत शोधिती तुकयाचा बुका;
तुकयाचा बुका यमाच्या कपाळीं
ढगांत सांडून कोरडी काजळी.

डिसेंबर, १९५६

# छातीवर हादरा

अधांतरीं काजळी आणखी पाण्यावर भोंवरा ;
झाडें झालीं मुकीं मुकीं अन् बनबांबू बावरा.

बनबांबू बावरा घुमवितो कातर काळें दुःख ;
जळीं निखळती रानपरींचे निळेजांभळे पंख.

पिकूं दिल्याविण कुणी कातरी गडद पोपटी फळें,
चोंच उघडुनी विव्हळ झालें घरव्यावरचें खुळें.

घरव्यावरचें खुळें पाहतें : घाव ढगा लागुनी
सर एखादी कोसळते का पानपान उजळुनी.

नुक्ती कोठें मांजर व्याली जीव सान कोवळे ;
तोंच दाटले काचेवरतीं अवेळचे कावळे.

अवेळचे कावळे आणखी अधांतरीं काजळी ;
छातीवर हादरा : भोवरा खोल गरगरे जळीं...

७·१·५७

# अर्धी संध्याकाळ आतां

लाल माती पावुलांशीं, निळा ढग डोईवर,
डहाळीचा काळा पक्षी उंच उंच ताणी सूर.

रंग रंग दाही दिशा, न्हातेंधुतें झालें ऊन,
येऊं लागे उष्ण वास सारें आकाश पिकून.

उफाड्याचें झोंबे वारें गरतीच्या चंद्रकाये,
अर्धी संध्याकाळ आतां चंद्र उगवाया आहे.

लाल माती झाली मंद, निळा ढग झाला लाल,
डहाळीचा काळा पक्षी स्वरांहून बोले खोल.

३-२-५७

# कहाणी

सुटे सुटे मणी झाले
माळ झालेली रिकामी;
पान पान ओघळून
झाली मोकळी डहाळी.

आतां गळ्याखालीं फक्त
अश्रू अश्रू सांचलेला;
आणि काळाभोर पक्षी
दूर कुठें उडालेला...

फेब्रुवारी, १९५६

## व्रतस्थ माझी फक्त पापणी

वीष प्यायचें राहुन गेलें
आणि निखळली खोल चांदणी ;
इथें कोरडा उष्टा पेला
आणिक जळती मोनी जिवणी...

मृण्मयास मज छळण्यासाठीं
रात्र राहिली ज्योतिर्मय का ?
अन् घुबडाची चोंच राहिली
खोलपणा हा खुडिल्याविण का ?

मागिल मरणांचीं मज सुतकें
झाला जन्मांचा न बारसा ;
हवा कशाला असल्या भाळा
त्या सूर्याचा लाल कवडसा ?

वीष प्यायचें राहुन गेलें
आणि निखळली खोल चांदणी ;
उष्टा पेला निरखित राहिल
व्रतस्थ माझी फक्त पापणी.

२०.२.५७

# आंबा पिके तसूतसू

अशी प्रसववेदना, असें जीवघेणें दान ;
गर्भ कसा तरी वाढे लक्ष पाकळ्या खुडून.

आंबा पिके तसूतसू—तसतसें डोळां पाणी ;
डोळां पाणी साठे गोठे...मुकी काळीजकहाणी.

असा मार सोसतांना जखमेंत रुजे कांटा ;
याच एका आधारानें चालायाचें वेड्या वाटा.

अशी प्रसववेदना, असें जीवघेणें दान ;
एका फुलासाठीं गेल्या लक्ष पाकळ्या सुकून...

फेब्रुवारी, १९५७

# अशा वेळीं

धूप जळतो रक्तांत,
धूर भिडतो चंद्रास,
थेंबें थेंबें झोंबे जळ
पापण्यांस कासावीस.

अशा वेळीं बांसरीला
कळे भैरवीचा सूर
(परि जागे
कुठें तरी
कुढणारें कुणी तरी
शाप लाख सोसणारें)
घेई ठाव काळजाचा
पुन्हां वादळला तीर.

अशा वेळीं,
अशा पिशा वेळीं
काळजाच्या कळ्याकळ्या
साती रंगें ओथंबती.
जित्याजागत्या मरणा
मिठ्या घालून फुलती.

फेब्रुवारी, १९५७

# वास आहे ना फुलांना ?

साद घातलेली आहे
दूर कोल्हेकुईच्याही,
वाळूंतली कुरकूर
जियें श्रांत संपलेली.

मला पांगळ्याला पडे
श्रांत थोडी किनाऱ्याची ;
हवी आहे कुबड्यांना
जागा जरा निवाऱ्याची.

साद घातलेली आहे
माझ्या काळजाच्या पैल ;
वास आहे ना फुलांना ?
हुंगावया हवें खोल...

मार्च, १९५७

# देणें

श्वास श्वास हट्टी धिमे पुरवून वापरणें,
कुठें एखादा सेकंद मुळांतून उखडणें
याचें नांव वरींदारीं
थोडें जिवंत असणें.

देह झाला जरी देव तरी लागतोचि देणें,
देणें फेडिलें पाहिजे दोन पायांच्या पीडेनें.
आणि हांसलें पाहिजे
जीभ चावून दांतानें.

सभोंवतीं नभ घळे लखलखे रानोरानीं,
तरी आवडीचा शब्द कधीं आणूं नये मनीं.

एप्रिल, १९५७

## हृदयाच्या ठेक्यापुढें

कळे निर्मळ स्तनांचे टपोर भरले,
लाल ओठ तरी तिचे दुधाचे राहिले.

श्वास आणि कवडसे चंद्र आणि राधा
त्वचेची दुपार तिचा गोरा गोरा बांधा.

कृष्णपक्षांतील तम गात्र गात्र शोषी :
पंख चोरून चालते केव्हां केव्हां हंसी.

गुंफण्याहूनही फुलें वेचिण्याची घाई ;
हृदयाच्या ठेक्यापुढें तासकांटा जाई.

एप्रिल, १९५७

# फिरतो व्यंगाचा स्वामी

तुटली उल्का, काजळलें नभ, डुचमळलें मन ;
क्षीणतेज अन् दीपस्तंभीं घुसमटला तम.

पानोपानीं कडू शहारा किरें इषारा ;
आसूंआसूं पिंजुन पडला सळसळ वारा.

गात्रीं गात्रीं रक्तढिलाई रुक्षरिकामी ;
देत पहारा व्यंगांचा कुणि फिरतो स्वामी.

निर्जन पथ अन् त्याहुनही घर वैराणरितें ;
कान फडाडुन तिथेंच काळें श्वान बैसतें.

ठरले डोळे यक्षजळांतिल फक्त बुडबुडे ;
या रात्रीला कुठें उंबरा ? कुठें कवाडें ?

असें आदळे ओहोटीचें ऊर कुठें तरि ;
दिशाहीन अन् भरती गाजे दूर कशी तरि.

घटीं काजळे पतंगाविणा दिवा केसरी ;
तुटली उल्का—रिघे फिरे या सर्व शरीरीं...

एप्रिल, १९५७

# ती

तिच्या डोळां खोल खोल तेवणारी
आहे दीपछिन्नीऐशी सहस्त्रवेणा,
न मालवणारी प्राणफुंकरीनें.
निर्भय ती तेथें मृत्युरेषेवर...
डोळे आणि अश्रू गोठूं गेले तरी
प्राण पणा लावी कृशांगी कोमला.
आणि घडतसे
अंधारपुतळा. (क्षणोक्षणीं
शोणित शोषित अनंत दिशांनीं
यथासांग.)
म्हणोनियां
गर्व तिला इतुका हा दुःखांचा.
झुरणें तिचें विकसन.
शकलें...शकलें...
बाजूस काढून कधीं तरी पाहे
आंतील लखलखीत गर्भपान्हा.

एप्रिल, १९५७

# चुके न ठेका

अनंतहस्तें खुडिला चांफा तरी
फुलावयाचा थांबेना पळभरी;
दुवा निखळला कितीक वेळां तरी
नग्नपणाला कात चढे भरजरी.
चुकण्याची जरि गुंफण होते तरी
हृदयापाशीं चुके न ठेका...
दूर थबकती हांका...लाटा...

मे, १९५७

## अर्घ्य

उठुनि कधीं जातां मी क्षणक्षण तूं चेतविले...
लक्ष लक्ष शिल्पांच्या भग्न दिशा किर्र निशा
मीरेच्या पेल्यांतिल किरणांनीं सांधियल्या.
लाल कडें अर्थांचें अधरां तूं लावियलें :
मूर्तिमंत तूं अशब्द.

मूर्तिमंत तूं अशब्द शब्दांतिल वलय निळें
खोवुनियां ; मळभच तूं चाळवून नुपुरविलें ;
टपटपलें विश्लेषण...रंग रंग थेंब गंध...
पाण्याचा गाण्याचा. फूलफूल गजबजलें :
शब्दांकित मूर्तहि पण.

उठुनि कधीं जातां मी लहरी लय रक्तांतिल
कोंडुनियां ; श्वास श्वास ऊष्ण घाव साहिलेस.
दुरुनि फिरुनि येतां पण दूर कुठें बघत वाट
दूरांतच अश्रु अश्रु गुंफित तूं राहिलीस
पांघरून दूरपणा.

उठुनि कधीं जातां मी अचल तुझा खिन्नपणा
अवसेपरि गहनदुणा क्षितिजतळा लांबवितो ;
दुरुनि फिरुनि येतां मी मन राहीलें न पूर्ण,
देहच हा होत उणा ; क्षण यात्रा थांबवितों :
शून्यकाय तेवशि तूं.

शून्यकाय तेवशि तूं घन काळा शोषुनियां ;
वंशवनीं वाट चुके शुभ्र आर्त कबुतर अन्
सूरसूर थरथरला...जळ अधिकच काजळलें...
मीं यावें तों सारें गेलेलें उस्कटून :
दुभंगून मी किटलों.

फिरुनि उठुनि जातां मी घनघन तूं (कृष्णकडा
चुंबुनियां) खोल दीर्घ सांतांतच बुडवियले ;
दुरुनि कधीं येतां अन् चपल तुझ्या स्वरुपांपरि
निर्मळ अन् अविकारी दर्शनही नच घडलें :
रुद्धध्वनि घुमवि गुहा.

गूढ धुकें...लाल फिका रंग...त्यांत सूर दुखे.
उठुन परंतु जातांना मार मुका गात्रांना ;
दुरुन परत येतांना रणरण हें ऊन असें,
पर्णपर्ण उग्र असें...तीक्ष्ण सुया पक्ष्यांना
बोचुनियां गळति पिसें.

उठुन इथुन जावें अन् येउं नये परत पुन्हां...
अर्घ्य तुझें अर्पों गे सूर्य तुझा सर्वांना ;
कात गळो कुब्जेची.
मी नसलों, तूं तरिही लाव दिवा तेथें गे
जेथें मी तुजसह गे पाजळून देहउन्हा
ठेविल्यात रात्रखुणा...

सप्टेंबर, १९५७

# कळतें तें रक्ताला

मोर विसरला केका तरिही घनिं काळ्या जळ भरतें,
रिवला कांटा...वाजे घंटा...घटिका काजाळें बुडते,
वाट वनीं घुटमळते.

ज्या पाण्याला नसे बुडबुडा
फुटलेला तेथ घडा,
पायरवाच्या नुपुरकळ्यांना
हुंगितसे रात्रकिडा;
त्या देहाची याद भरजरी
अजुन उरीं साद आर्त,
खुडितां खुडितां फुलें जुईचीं
ओंजळही गढुळ होत.

मोर विसरला केका तरिही कंप असे तारेला;
घनिं काळ्या दुखतां जळ...कळतें तें रक्ताला...

११·११·५७

# तुझी माळ गुंफ त्वरें

तुझ्यापास वळतांना
तुझा असेन
तुझा असेन नसेन...
परंतु
सारे भंगलेले कांठ
तुटलेले देठ
जोडशील कशानें तूं ?

तुझ्यापास वळतांना
माझ्या वाटा वेड्यातिड्या ;
पुढें रान मागें रान ;
गोठलेलें पान पान ;
तूं कोठें अन् मी कोठें ग ?

तुझी माळ गुंफ त्वरें :
मीही जरा होतों खरा...
तोंवरी ग उजळेल
माझ्या डोळां आंसूं खारा.

१९·११·५७

# ज्याचीं फुलें फुलें झालीं

ज्याचीं फुलें फुलें झालीं
तोच झाला आहे गुप्त ;
ज्याला फुलें फुलें आलीं
तोही आतां वठे फक्त.

माथ्यावरी उन्हें येतां
आलें पावुलांना बळ ;
आणि कातरवेळेची
उरीं मावेनाच कळ.

पंख जरा ओले होतां
खोल डहुळते दिठी ;
आणि फुलण्याच्या वेळे
ढोलावर पडे काठी.

तिथें दचकते कळी
आणि उसवतें रक्त ;
ज्याचीं फुलें फुलें झालीं
तोच झाला पुन्हा गुप्त.

नोव्हेंबर, १९५७

# मी मधें पाहुणा

करीं धराया हवा दीप अन् हवीच मैना :
दोघेंही पण फडफड करिती तें सहवेना.
सहवेना परि सुटका नाहीं या घटकेला ;
ठेंचाळावा उगाच तम कां आडोशाला ?

कटु अभ्रांतिल हवा वाहते या प्रारब्धीं
आणि विर्घळे मीठ मनांतिल शब्दींशब्दीं ;
रानफुलांतिल परी शापिली या बाधेनें,
नागफडेवर घडा मधाचा दिला परीनें...

अजून जागी काळी मुंगी गीतगव्हावर,
अजून जाळें बांधित कोळी फुलाफुलावर ;
चुकून मळलें पाउल तरिही दुखतें गाणें,
उरलें केवळ ठसा मागचा वळून बघणें.

करीं धराया हवा दीप अन् हवीच मैना :
प्रकाश दुखरा चोंच आर्त मी मधें पाहुणा.

मार्च, १९५८

# अंतराळ उल्का उल्का

तुटे चांदणी एक, परंतू अंतराळ उल्का उल्का
(तळास कोठें फुटे शिंपला) झेलाया कर दोनच कां ?
झेलाया कर दोन पुरे तर ती-मी झालों दुभंग कां ?
दुभंग झालों तरी नसावा या डोहावर तरंग कां ?
दिव्यादिव्यानें गाभारा मी उजळुनि फिरलों माघारा,
तरि घंटाध्वनि दूरदूरचा वारा निखळुन ओढी कां ?

धूपदाणिंतिल धूर निवे अन् वसनें घळतां जाग विरे;
घरटीं झालीं निवांत तरि पण पंखांचा मनिं कंप उरे.
तीक्ष्ण दिठीचें गरळ ठिबकतें थेंब थेंब कंपीं पंखीं ;
मिठींतलें 'जड' खुडितां खुडितां रुतलों पुरता पंकीं.
रुतली नाहीं माझ्यापरि ती (देंठ होउनी कमळाचा
लक्षदलांचें कमळ जाहली) ; मी स्वामी या कांठाचा.
कांठावरचा नुपुर हरपला, राजहंसि तर दूर उडे ;
सभोवतीं घन...वाटा वाटा, मागें वाळू, रान पुढें.
मागें वाळू रान पुढें अन् क्षीणदिशा...मन तमीं बुडे ;
उठावयाचे जिथें बुडबुडे तिथेंच गेले फक्त तडे...

शेजेपाशीं परत निघाल्या तरल पदांचे लाल ठसे ;
दूर धुसुरशा क्षितिजकडेशीं अभ्रगौरिचें खोल हसें.
अभ्रगौरिचें खोल हसें तें असें ठसठसे इथें उरीं ;
घट मातीचा फुटतहि नाहीं ; किटे मात्र हा दीप करीं.
किटे सारखा दीप करीं अन् पाल चुकचुके शून्य घरीं ;
साद कुणाची यावी तरि कां याद नाहिं जर पैलतिरीं ?

अनुक्रम .................. दि. ..................
क्रमांक .................. नों. दि. ..................

गंधगर्भ ती कांटा देठीं नग्न मनाचा मी हलका ;
नग्न तनूची शिल्पशुद्ध ती अल्पबुद्धिचा मी परका.
डोळ्यांमधिं जळ नाहीं नाहीं (कांच्यांतुन कळ फिरतांना
वाऱ्यावांचुन हलती पानें) मार मुका घन घेतांना.
परडी झाली रिक्त कोरडी माळ कुठें तरि घळली का ?
घळलेल्याचा वास जिवाला कळावयाचा नाहिंच का ?

तुटे चांदणी...मिटे शिंपला...अंतराळ उल्का उल्का ;
एकच ओंजळ भरतां भरतां उभा जन्म हा होत रिता.

एप्रिल, १९५८

# झिम्मा

अतां कशाला खेळशि झिम्मा पिकून आंबा मावळला ;
वाऱ्यावरचा पतंग पोरी अभ्रकडांवर कातरला ;
रंग शोषितां पंखच हलका भरदिवसां ग मिटलेला ;
कमान चढतां चढतां कापुर असा उन्हाचा विझलेला.

फुटे पालवी तरी न घरटा लटकत कोठें फांदीला ;
रस गळला तरि चोंच वांझ अन् डंख न झाला लाल पुरा.
त्या घंटांचा नाद गोरजीं अजून आहे भरलेला ;
भरूं लागली होती घटिका तमीं बुडबुडा फुटलेला.

हळद-लागलें अंग हरवलें संध्याछाया शोधिति गऽ
चुडा अजुनिही कसा ग हिरवा पिवळी झाली दुर्वा गऽ
डुचमळली जरि तनु शेलाटी थवा स्तनांचा घमघमला,
तरी न होइल फणा हळदिवा गरळदिवा ग नाहिं निळा.

गंगेचा हा कांठ नसे, पण ठसा पदांचा तुझ्या निळा,
फुलें त्यावरी उमलत उमलत तरी न शिल्पित जडशीला ;
कडु कांठाचा पेला ओठां रितेपणानें भिडलेला
हात तुझा मम छातीवरतीं स्वस्तिक रेखित कां अडला ?

अतां कुडीची गिरकी गिरकी करी जिवाचा कां भंवरा ?
उन्हें वाहतीं होतीं जोंवर तोंवर होतों मीहि खरा.
काय पैंजणा दावुं खुणा मी ; कडा कडा ये सोल गडे ;
मिळते का बघ लयपुतळी अन् लाव कुंकु तिज भरुनि चुडे.

स्वरनलिकेंतुन किरण गोठले दिशा दिशा ग गहिवरली;
उडूं बघे पण दीठ उचलतां देठावरची तुटे कळी.
अतां कशाला खेळशि झिम्मा पिकून आंबा मावळला;
व्यर्थ हवेची खार हुंगिते पंख उराला डसलेला.

फुले घागरा वीज घनीं अन् अखेर अश्रू ओघळला;
ओघळला पण नाडीमधला ताल नि ठेका उस्कटला.
म्हणूं नये पण म्हटलीं गाणीं, कळीकळीवर रक्तखुणा;
या पापांचा फक्त धनी मी शीव शीव तूं या कवनां.

ऑगस्ट, १९५८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 10582

# गर्भार

आज कोरडा कोरडा मृगाचा दिवस ;
वाऱ्यासह वैतागला घनभार ; श्वास
टाकूंच येईना
गळा दाटून येईना
पाय नीटच पडेना
लक्ष घागरींचें पाणी
उन्हा शिवाया धजेना
नव्या गर्भार सुनेला तळें चढाया झेपेना...
क्षितिजास अंग नुरे ; मागें परतल्या वाटा ;
घन येणार पाहुणा
घन येणार पाहुणा...

ऑगस्ट, १९५८

# पुढील प्रदेशा

पायांत पैंजण रात्र झाली उंच ;
चुणीचुणी लाल, जागी झाली चोंच :
किरणकळसा
घालून वळसा
पांखरूं निघालें
पुढील प्रदेशा...

ऑगस्ट, १९५८

# दीपदान

मी न तसा अन् मला नको ती भ्रांती,
या घरची मी हुंगित बसलों माती ;
कधींमधीं जर उंबरठ्यावर आलों,
पायांभंवतीं अभ्रें दाटुन फिरती.

अभ्रांकित पण किरण वेंचुं मी जातां
निरभ्र होउन स्वर सनईंत भरावा ;
अलगद गुंफित लक्ष निखळते दुवे
अधांतराचा कुणी पाहुणा यावा.

यापुढचा पण कुणी असावा मागें
ज्या ऐकूं आला अथवा नाहिं नुपूर ;
हवाच पिळते कडा कडा दृष्टीची
अन् ओसरतो हा अथांगतेचा पूर.

पायच असले रितेपणानें मळती,
पंथ चुकीचा परी सनातन घरचा ;
धुंडित असतां कुडीस खिळती नातीं
दीपदान घे मागें बघून पुढचा.

कसाहि मी परि मला हवे हे जन्म
अन् नको नको ती तीच भ्रमंती ;
कधीमधीं जर उंबरठ्याशीं आलों,
तर घर सोडुन दरींत घळती भिंती.

ऑक्टोबर, १९५८

## झाडें वांकलीं

किती घांस मागूं तरी
अशी हुंगीत पोकळी ;
तिन्हीसांज झाली तरी
गाई हाणिना गवळी...

कौलें भिजलीं दंवानें
ऊन पेटलें दुपारीं,
काय पुढें सांजकाळीं
भरे कानांत कांपरी ?

ओंजळीला दहा बोटें
मागतात दाही दिशा ;
चांदणीचे स्तन स्तन
बासे केले जगदीशा !

पाठीमागें फक्त कणा...
हवा तर नाहीं म्हणा ;
पुच्छ तुटकें खुशाल
हवागुच्छावर हाणा.

कोसाकोसावर घरें,
मधें शून्यच तरंगे,
कुठें धुळींत श्वानाचीं
नखें पायठशांसंगें.

(करा तयारी
झाडें वांकलीं
वाजली तुतारी ;
करूं आतां तरी आतां तरी
अर्ध्या मुड्यांची चाकरी.)

ऑक्टोबर, १९५८

# पाहिलेंच नाहीं कोणी

आलें होतें मघाशींच
इथें ओलेतें पांखरूं ;
पंख झाडून उडालें...
थेंब थेंब गेला जिरूं.

नाहीं सर ओसरली ;
डहाळीला लागे धारा ;
मंद मंद ऊन रांगे ;
सांज सांधी ओला वारा.

सरकते उन्हासंगें
इथें पुढें पुढें सांज ;
घडी मोडाया वाऱ्याची
पुन्हा पुन्हा वाटे लाज.

पंख झाडून उडालें
मघाशींच आरपार
इथें उरलेलें घर ;
वर खळाळे छप्पर.

पंखीं सारेंच राहिलें...
तहानेला नाहीं पाणी ;
थेंब झाडून उडालें...
पाहिलेंच नाहीं कोणी.

ऑक्टोबर, १९५८

# भार

क्षणक्षण जपले तरिही सरला दिस सरली मधुराती;
माडांमधल्या मठिंत उजळिल्या जपून जपून वाती.
रचिली होतिस रास फुलांची...सुटला भणभण वारा;
गंध उडाला आणिक विझला मिणमिणता गाभारा.

हार गुंफिले होते-नव्हते तोंच तुटावी गांठ.
हृदयापाशीं उरे पाकळी...पाकळ्यांतला देंठ.
नग्नमिठींतिल निरभ्र निर्मळ चुंबनकंपित ओंठ
पुटपुटले अन् कसे करपले...“पुरे...संपली भेट.”

काय कुणाला कळली होती दिशा ग पायठशांची;
तुटून उल्का विचित्र दिसली रेषा भाळावरची.
या तारांवर मंद कंपनें कधींतरींची उरलीं;
कधींच नकळत रेषा रेषा तळहातींची सुकली.

पुरा होतसे नुक्ता कोठें आतां दिठींत आसूं
तुला मला तो दूर राहुनी भार हवा ग सोसूं.

एप्रिल, १९५९

# मनाचा दगड

गेलें द्यायचें राहून
तुझें नक्षत्रांचें देणें;
माझ्यापास आतां कळ्या
आणि थोडीं ओलीं पानें.

आलों होतों हांसत मी
कांहीं श्वासांसाठीं फक्त;
दिवसांचें आतां ओझें
रात्र रात्र सोशी रक्त;

आतां मनाचा दगड
घेतों कण्हत उशाला;
होतें कळ्यांचें निर्माल्य
आणि पानांचा पाचोळा.

३१.५.५९

अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

# देहपूजा

माझीं वस्त्रें तुझीं झालीं
पंख सारे मिटले ग,
पंख आतां मिटले ;
चोंचींतले उष्टे थेंब
पानींपानीं पडले ग,
वाजले मीं ऐकले ग,
वाजले मीं ऐकले...

माझीं वस्त्रें तुझीं झालीं
रंग मात्र फसले ग,
रंग रंग फसले,
डोळे चारी मिटले आणि
ओठ ओठां डसले ग,
ओठ ओठां डसले...

या अवसेच्या रात्रीं कुठें निघालीस परडी घेउन ?

तृप्त फुलें झालीं ग,
फुललीं तेव्हां सरलीं ;
आतां कुठें उरलीं ग,
गंधपुटें गालीं ग,
गंधपुटें गालीं...

परडीभर तरि मिळेल का ग डोहिं कुठें चांदणें ?

कुठें कुठल्या झाडांखालीं
उभी नको राहूं ग,
उभी नको राहूं ;
अजून त्यांची सळसळ
नाहीं जिरली ग,
सळसळ नाहीं जिरली...

माझीं वस्त्रें तुझीं झालीं,
तुझीं वस्त्रें वारा झाला,
गात्रांच्या गारा झाल्या ;
माझीं वस्त्रें भिजलीं ग,
माझीं वस्त्रें भिजलीं ;
दूर तिथें देवळापुढें
दीपमाळ विझली ग,
दीपमाळ विझली ;
तुझीं वस्त्रें कुठें गेलीं ?
माझीं वस्त्रें तुझीं झालीं !
परडीभर चांदण्यानें
देहपूजा सजली ग,
देहपूजा सजली...

५.६.५९

# डोह

इथेंच होता तळ त्याचा अन् अजून ओली रेती ;
नकोस रोवूं नको पावुलें...दुखावेल गऽ मोतीं.
रिताहि झाला असेल येथें घन केव्हां स्वातीचा,
दिवा उजळिला असशिल तूंही लक्ष लक्ष वातींचा.
वेल उन्हाची मावळतांना शोधित पक्षी घरटें—
इथेंच पेंगुळले तेव्हां ते ; कांठ हरवले कोठें ?
खोल जळाविण काय असावें वेदनेहुनी दुसरें ?
थरथरतांना असेल झालें चांदणेंहि ग दुखरें.
मिठींत असतां साद पडावी तुझ्या जिवाची; राणी !
डोहावर त्या असशिल भरली कळशी तूं बालपणीं !
न्हाली असशिल पहिली तेथें शिवून प्राजक्ताला...
या आशेवर आज म्हणावें मोती असेल घडला.

१७.६.५९

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २४००२ दि: ७/०४
क्र. ९९७२ नोंद दि: २४।११।५८
REFBK-0010582
REFBK-0010582